आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता
१० मार्च २०२५ सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यासाठी नवे औद्योगिक, कामगार, गृहनिर्माण, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्याची अर्थमंत्री अजित पवार यांची अर्थसंकल्पात घोषणा

- चालू आर्थिक वर्षासाठी ५१ हजार ४६३ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या लोकसभेत सादर

- विधान परिषदेच्या ५ जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी

**आणि**

- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ट्रक उलटून झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू, तर ११ जण जखमी

**<><><><><>**

राज्याचं नवीन औद्योगिक धोरण, कामगार धोरण, गृहनिर्माण धोरण तसंच आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण लवकरच जाहीर करण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केली. उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि संलग्न क्षेत्रे, सामाजिक तसंच इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदी करणारा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. यात त्यांनी नवीन औद्योगिक, कामगार, गृहनिर्माण, जलप्रवास, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरणाची घोषणा त्यांनी यावेळी केली.

नव्या औद्योगिक धोरणातून ५ वर्षात ४० लाख कोटींची गुंतवणूक, ५० लाख रोजगारनिर्मितीचं उद्दिष्ट सरकारनं ठेवले आहे. केंद्र सरकारच्या नवीन कामगार संहितेनुसार नवं कामगार धोरण राज्य सरकार तयार करणार आहे. मुंबईत गेटवे इंडियापासून मांडवा आणि एलिफंटा पर्यंतच्या जल प्रवासासाठी आर्थिक प्रोत्साहन

देण्याचं धोरण सरकार जाहीर करणार आहे. याशिवाय राज्याचे नवे आरोग्य आणि जेष्ठ नागरिक धोरण तसंच  गृहनिर्माण धोरण लवकरच सरकार जाहीर करणार आहे.

हवाई वाहतूक, रेल्वे, मेट्रो, महामार्ग, जल वाहतूक, बंदर विकास, सिंचन, ऊर्जा, परिवहन आणि दळणवळण यासारख्या पायाभूत सुविधा क्षेत्रात येत्या ५ वर्षात विक्रमी गुंतवणूक करण्याचा सरकारचा विचार असल्याचं अजित पवार यांनी जाहीर केलं. नवी मुंबईत अडीचशे एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर उभारलं जाणार आहे. याशिवाय मुंबई महानगर क्षेत्राची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० अब्ज डॉलरवरुन २०३० पर्यंत ३०० अब्ज डॉलर आणि २०४७ पर्यंत दीड ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट सरकारनं ठेवलं आहे.

अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७ राज्य सरकार तयार करणार आहे. याअंतर्गत पर्यटन केंद्र, तीर्थक्षेत्र, धार्मिक स्थळं, गडकिल्ले, राष्ट्रीय उद्यानं, अभयारण्यं, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली वसाहतीतल्या रस्त्यांचे काम केले जाणार आहे. ठाण्यापासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत उन्नत मार्ग बांधण्याचे नियोजन सरकारन केलं आहे. याशिवाय ठाण्यात बाळकुम ते गायमुख किनारी मार्ग आणि उत्तन ते विरार सागरी सेतू बांधण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. येत्या वर्षात मुंबईत ४१ किलोमीटर तर पुण्यात २३ किलोमीटरचे मेट्रो मार्ग सुरू होणार असून येत्या ५ वर्षात राज्यात २३७ किलोमीटरचे मेट्रो मार्ग राज्यात सुरू करण्याचं नियोजन आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन पुढच्या महिन्यात तर अमरावतीतल्या बेलोरा विमानतळावरुन महिनाअखेर वाहतूक सुरू होणार आहे, असं त्यांनी आज जाहीर केलं. एसटी महामंडळाला नवीन बस खरेदीसाठी सरकार अर्थसहाय्य देणार असून ६ हजार डिझेल बसचे CNG, LNG मध्ये रुपांतर करण्याचं काम सुरू आहे.

**<><><><><>**

आगामी आर्थिक वर्षाचा एकूण ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प अजित पवार यांनी आज सादर केला. त्यात ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपयांची महसुली जमा आणि ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपयांचा महसुली खर्च अपेक्षित आहे. यात ४५ हजार ८९१ कोटी रुपये तूट अपेक्षित आहे.

२०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे. त्यामुळं राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरल्याचं अर्थमंत्री म्हणाले. तसंच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन पहिल्या टप्प्यात राज्यातल्या ५० हजार शेतकऱ्यांच्या १ लाख एकर क्षेत्राला लाभ देण्याचा निर्णय सरकारनं आज जाहीर केला. यासाठी येत्या २ वर्षात ५०० कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याची कामे पुढच्या आर्थिक वर्षाअखेरपर्यंत पूर्ण केली जाणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ या योजनेच्या अनुदानात ५०हजार रुपयांची वाढ पवार यांनी आज जाहीर केली. या अंतर्गत सर्व घरकुलांच्या छतावर सौर उर्जा संच बसविण्यात येणार आहेत. १०० युनिट वीज वापरणाऱ्या सुमारे दीड कोटी वीज ग्राहकांना छतावरील सौर उर्जा संच खरेदीसाठी अनुदान सरकार देणार आहे. या योजनेमुळे येत्या काही काळात राज्यातील सुमारे ७० टक्के वीज ग्राहकांचे वीजबील टप्प्या टप्प्यानं शून्यावर येईल, असं ते म्हणाले. वैद्यकीय महाविद्यालये, आरोग्य संस्थांसह राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर विद्युत यंत्रणा लावण्याची घोषणा त्यांनी आज केली. येत्या आर्थिक वर्षात लाडकी बहीण योजनेसाठी ३६हजार कोटींचा निधी राखून ठेवला असल्याचं अर्थमंत्री म्हणाले. राज्यातल्या पावणे २

कोटी असंघटीत कामगार आणि शेतमजुरांसाठी सामाजिक सुरक्षा योजना सरकार राबवणार आहे. अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४२ टक्के, आदिवासी उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४० टक्के एवढी भरीव वाढ केल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

**<><><><><>**

कांद्यावरचं २० टक्के निर्यात शुल्क कमी करण्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून एक निश्चित धोरण आखू आणि याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. छगन भुजबळ, रोहित पवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात याबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. कांद्याला २ हजार २५० रुपये किमान हमीभाव द्यावा अशी मागणी भुजबळ यांनी केली.

… ते म्हणाले…

**होल्ड बाईट- छगन भुजबळ ( १६ सेकंद )**

यावर या मागणीसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल, असं सरकारनं सांगितलं. कांद्याची देशांतर्गत निर्यात वाढवण्याचा तसंच कांदा चाळी वाढवण्याचा प्रयत्न करू, असं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा उपक्रम असलेल्या वेव्हज अंतर्गत अँटी पायरसी चॅलेंज स्पर्धा ठेवण्यात आली आहे. आजच्या डिजिटल युगात दृक्श्राव्य आशयात होणारी फेरफार तसंच अनधिकृत प्रसारण रोखण्यासाठीची आव्हानं वाढत आहेत. या पायरसीला रोखण्यासाठी फिंगरप्रिंटिंग आणि वॉटरमार्किंग तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं कॉन्फेरडेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजच्या सहकार्याने या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या स्पर्धेचा उद्देश डिजिटल माध्यमावर

प्रसारित होणाऱ्या आशयाला सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने तंत्रज्ञान प्रगत करणं हा आहे. वेव्हज उपक्रमाची अंतिम फेरी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षासाठी विविध विभागांच्या खर्चासाठी ५१ हजार ४६२ कोटी ८६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत आज सादर केल्या. या रकमेतला बहुतांश भाग निवृत्तीवेतन आणि खतांवरच्या अनुदानासाठी दिला जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र आजपासून सुरू झालं. पीएम श्री योजनेच्या अंमलबजावणीबाबत तमिळनाडू सरकारवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलेल्या टिप्पणीच्या निषेधात द्रमुक सदस्यांनी गदारोळ केला. घोषणाबाजी मुळे सभागृहाचं कामकाज अर्धा तास तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

मतदारांना एकापेक्षा अधिक ओळखपत्र जारी होणं, अमेरिकेकडून आर्थिक मदत, मतदानाच्या प्रमाणाविषयीचे मुद्दे, इत्यादी विविध मुद्द्यांवर राज्यसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव उपाध्यक्षांनी फेटाळल्यामुळे नाराज झालेल्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज विधान परिषदेच्या ५ जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. निवडणुकांसाठी १७ मार्च पर्यंत अर्ज दाखल करता येतील, १८ मार्चला अर्जांची छाननी होईल आणि २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटल्यास २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आज पहाटे एक ट्रक उलटून झालेल्या अपघातात सहा कामगारांचा मृत्यू झाला, तर ११ जण जखमी झाले आहेत. ऊस वाहतूक करणारा हा ट्रक कन्नडहून पिशोरकडे जात असताना पिशोर घाटात चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ट्रक उलटला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचाव कार्य सुरू केलं. उसाच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या चार कामगारांचा जागीच तर २ कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमींवर सरकारी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या पाच जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ११ मार्चपर्यंत कोकणासह मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

**//<><><><><>//**